# ‘इंडिया इज माय कंट्री’ : काळाच्या पुढे बघायला लावणारी कविता

**डॉ. सुनील अभिमान अवचार** मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ,मुंबई

---

कवयित्री नेहा गोडघाटे लिखित 'इंडिया इज माय कंट्री' या काव्यसंग्रहांची दुसरी आवृत्ती १४ फेब्रुवारी २०२३ रोजी छवि पब्लिकेशन्स, नागपूर तर्फे प्रकाशित झाली. बावीस वर्षांपूर्वी या काव्यसंग्रहाची प्रथम आवृत्ती कवी अरुण काळे, जावेद पाशा, प्रा. गंगाधर अहिरे, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर यांच्या उपस्थितीत २००२ साली प्रकाशित झाली होती, या काव्यसंग्रहाला ज्येष्ठ साहित्यिक बाबुराव बागूल यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

२५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले. या संस्मरणीय दिवशीच म्हणजे, २५ डिसेंबर २००२ रोजी नेहा गोडघाटे या पंधरा वर्षांच्या 'दीक्षाभूमी'तील लहानग्या कवयित्रीच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले होते.

"मराठी साहित्याच्या नव्या प्रवाहाची प्रवक्ता म्हणून मी नेहा गोडघाटे या लहानगीचे कौतुक करतो. फुले, आंबेडकरी विचाराने नवीन पिढीला मानवी मुल्यांनी संस्कारित केले आहे", अशा शब्दांत बाबुराव बागुलांनी नवोदित कवयित्रीचे त्यावेळी कौतुक केले होते. पुढे ते असेही म्हणाले होते की, "मी तरुण साहित्यिकांना संदेश देतो की, एक 'चिमणी' जितकं धाडस करते तेवढं धाडस तुम्ही करा आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात फुले आंबेडकरांचा जयघोष करीत आकाश कवेत घ्या !"

नेहा गोडघाटे ह्या बहुभाषिक कवयित्री व लेखिका असून त्यांनी मान्यताप्राप्त संस्थांमधून अभियांत्रिकी व व्यवस्थापन विषयाचे शिक्षण पूर्ण केलेले आहे. कॉर्पोरेट कंपनीत काम करताना देखील त्यांनी आपले कवी मन जपलेले आहे. त्यांची एकूणच कविता ही माणुसकीचा शोध घेणारी आहे. म्हणूनच, त्या म्हणतात, 'आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या काळात माणुसकी शोधणे कठीणच !'

सावित्रीमाई, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी वेचलेले आयुष्य, हा समाज बदलावा, त्यात नवीन काहीतरी निर्माण व्हावं, सगळ्यांना समान दर्जा मिळावा, सर्वांनी शिक्षण घेऊन आपल्या हक्कांसाठी लढावं म्हणून केलेला संघर्ष कवयित्रीच्या डोळ्यांसमोरून जाऊ लागला. या सगळ्यांमुळेच त्यांच्या विचारांच्या कक्षा रुंदावल्या. आपली काव्यलेखनाची भूमिका मांडताना त्या म्हणतात, "समाजात चाललेल्या अव्यवस्थेबद्दल अधिकाधिक जाणून घेण्याचा प्रयत्न मी करू लागले आणि माझ्या कवितेची कुस तयार होत गेली. मी घडत गेले. शब्द धावून येत होते आणि भावना कविता बनत होत्या. माझ्या भावनांची, शब्दांची ताकद आली, ती इथे! माझ्या पंखांना बळ मिळालं आणि मग कळलं, सारं आकाश माझ्यासाठी मोकळं आहे." तसेच, आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीचा डोक्यावर ताण पडून मनात एक ना हजार प्रश्न त्यांच्या मनात निर्माण होऊ लागले. मग त्यांनी स्वतः आत्मपरीक्षण करून त्यांच्या मनातील संघर्षाला कवितेच्या रूपाने बोलकं रूप देण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात त्या म्हणतात, "माझी प्रतिमा एखादे झाड, फुल, किंवा सुंदर देखावे नव्हते, तर या समाजातील व्यवस्थेची मेख लक्षात आल्यावर, त्या समाजाची रचना बघितल्यावर 'इंडिया इज माय कंट्री' म्हणताना स्वतःच्या केलेल्या विश्वासघातावर निर्माण झालेली परिस्थिती म्हणजे माझी प्रतिभा ! स्त्री शोषणात शोषित झालेल्या स्त्रियांची आर्त किंकाळी म्हणजे माझी प्रतिमा !" 'सावित्री माई' या कवितेत कवयित्री लिहिते,

रखरखत्या उन्हात
सावली झाली
सावित्री माई !
जीवन उद्धारासाठी
समतेच्या स्वप्नासाठी
लढली शेवटच्या क्षणापर्यंत
सावित्री माई!

दीन-दुबळयांच्या जीवन उद्धारासाठी, समता प्रस्थापित करण्याच्या स्वप्नासाठी, शेवटच्या क्षणापर्यंत सावित्रीमाई लढल्या. सावित्रीमाई ह्या शिक्षणाचा दिवा प्रज्वलित करणाऱ्या, परंपरेला मूठमाती देणाऱ्या बंडखोर स्त्री होत्या. त्यांनी जोतीरावांसोबत अक्षर गिरवून समाजसेवेसाठी आपले जीवन अर्पण केले. म्हणूनच, त्या खऱ्याखुऱ्या सत्यशोधक वारस आहेत. जोतीराव फुलेंच्या मृत्यूनंतरही हिंमतीने संकटाला सामोरे जात नवी रीत सुरू करणारी सावित्रीमाई होती. शेवटी, स्त्रीमुक्तीचे गीत गाणाऱ्या आम्ही तिच्या लेकी आहोत, असे कवयित्रीला वाटते.

आज जर बाबासाहेब असते तर काय घडले असते ? या प्रश्नाचे उत्तर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या कवितेतून देताना कवयित्री म्हणतात,

बाबासाहेब,
विचारांना धार लावण्यासाठी !
स्त्रियांवर लादलेल्या नव्या मार्केट स्मृती विरोधात ! लाचारीच्या संस्कृती विरोधात तुम्ही लढला असता !
बाबासाहेब,
आज तुम्ही असता तर
लढ्याचे टोक धारदार झाले असते!

अजूनही संघर्षाचा लढा संपलेला नाही, आता फक्त समस्यांचे स्वरूप थोडे बदलले आहे; याची जाणीव तुम्हाला झाली असती आणि तुम्ही आधी दिलेल्या संघर्षाच्या लढ्याचे टोक आधीपेक्षा जास्त धारदार झाले असते, असे कवयित्रीला वाटते.

बघते, मंदिर आणि मस्जिद
यांमधील रस्त्यांवरची
मरणांतक शांतता
हृदय तेव्हाच थरारून जाते
मन अस्वस्थ होते

'मंदिर आणि मस्जिद' यांच्यामधील रस्त्यावरची मरणांतक शांतता बघितल्यावर हृदय थरारून जातं, मन अस्वस्थ होतं. काय हे जगणं? हा विचार कधीकधी येतो आणि आपल्यापेक्षा पक्षी बरे कधी मंदिरावर तर कधी मस्जिदवर उडतात. मंदिर आणि मस्जिद या मधील भयाण धार्मिक वास्तव कवयित्री शब्दबद्ध करते.

ज्या मार्गावर भविष्याच्या इमारती
निर्माण झाल्या
त्यांना रक्ताने सजविले
स्फोटांनी उडविले
आता माणसांनी जगण्यासाठी
दंगलीचे अस्तित्व का स्वीकारले?

'दंगल' या कवितेत दंगलीचे वास्तव व त्याचे सामाजिक परिणाम सांगितले आहेत. जिथं दंगली होतात, रक्त सांडले जाते, ते रस्ते भयाण वाटतात. त्यामुळे मन सुन्न होते, विचार बधीर होतात. माणुसकी ही माणसाची प्रवृत्ती आहे, पण तीसुद्धा आता AK56 च्या विळख्यात सापडली आहे. ज्या मार्गावर भविष्याच्या इमारती निर्माण झाल्या, त्या मार्गावर माणसांनी जगण्यासाठी दंगलीचे अस्तित्व का स्वीकारले? असा सवाल कवयित्री उपस्थित करतात.

माणसांपेक्षाही कागदी प्रमाणपत्राला किती महत्त्व आहे याविषयी 'पावती' या कवितेत, कवयित्री म्हणतात,

मला माणूस म्हणून
सिद्ध करण्यासाठी
त्यांनी पुरावे म्हणून
'कास्ट सर्टिफिकेट' मागितले
आज अशी कशी वेळ आली
माणुसकीऐवजी 'सर्टिफिकेट'
कामी येऊ लागले.

माणसाच माणूसपण सिद्ध करण्यासाठी पुरावा म्हणून कास्ट सर्टिफिकेट मागितले जाते आणि माणूसकीऐवजी सर्टिफिकेट कामी येऊ लागते. मात्र कास्ट सर्टिफिकेट दिल्यानंतर कवयित्रीला पुरावा म्हणून माणूसपण प्राप्त झाल्याची पावती हवी आहे. तेवढी द्याल का ? असा सवाल त्या उपस्थित करतात.

इंडिया इज माय कंट्री,
असं रोज म्हणतो आपण
पण रोज दलित मारले जात आहेत...
आजही, कश्मिर धगधगतो आहे आजही,

पंजाबात घुमतो वेदनांचा
हुंकार
आजही, अयोध्या अस्वस्थ आहे
आजही, भंवरीबाईवर सामूहिक
अत्याचार केले जातात
आजही, रूपकुंवर सती जाते
तरीही आपण रोज म्हणतो
इंडिया इज माय कंट्री ?

'इंडिया इज माय कंट्री' या वरील कवितेतून वर्तमान भारताचे अस्वस्थ करणारे वास्तव वाचकांपुढे उभे राहते.

'हिंसाचाराला 'लज्जा' आहे काय ?' असा सवाल 'तसलिमा नसरीन' या कवितेत कवयित्री उभी करते. हिंसाचाराचे नागडे सत्य उभे असताना या पृथ्वीवरील माणसाला त्याची 'लज्जा' वाटत नाही का?

सर्वधर्म समान आहेत',
म्हणणाऱ्या या देशात,
माझा राष्ट्रध्वज कुठे आहे ?

१९४७ नंतर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाची जशी फाळणी झाली, तशी राष्ट्रध्वजाची सुद्धा फाळणी झाल्याचे दिसते. राष्ट्रध्वजातील सर्व रंग जाती-धर्मांमध्ये वाटून घेतले गेले आहेत. हिरवा रंग मुसलमानांनी, केशरी रंग हिंदूंनी, निळा रंग बौद्धांनी, आणि पांढरा रंग ख्रिश्चनांनी वाटून घेतला आहे. मग येथे प्रश्न असा उपस्थित होतो की, संविधानासमोर सर्वधर्म समान असताना या देशात माझा तिरंगा राष्ट्रध्वज कुठे आहे ?

हातात हात असताना नव्हती जात ?
मिठीत असताना नव्हती जात ?
गुलाबी गोष्टी करताना नव्हती जात ?
मग,
संसारच म्हटल्यावर
आडवी कशी व
का आली ती जात?

'जात' या कवितेत प्रेमामध्ये जात कशी आडवी येते हे बघायला मिळते. प्रेम करताना, एकमेकांसोबत चांदण्या रात्री हातात हात घेऊन फिरताना कधीही जात आडवी येत नाही. परंतु ज्या वेळेस प्रेयसी आपल्या प्रियकराला आपण संसार करू असे म्हणते. त्यावेळेस मात्र तुझी जात कोणती? असा प्रश्न उपस्थित केला जातो. मग जी जात मिठी मारताना आडवी येत नाही, गुलाबी गोष्टी करताना आडवी येत नाही, ती संसार करायचा म्हटल्यावर कशी आडवी येते ?

राममंदिर आणि बाबरी मस्जिदीच्या
दंगलीचे स्वातंत्र्य की,
ज्यासाठी इतिहास रचला
ते स्वातंत्र्य,
तसलिमाच्या 'लज्जा' वर
आक्षेप घेण्याचे स्वातंत्र्य,
की, १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला
ध्वज फडकवण्याचे स्वातंत्र्य,

१९४७ ला भारत स्वतंत्र झाला खरा; परंतु हे स्वातंत्र्य काही मूठभर लोकांच्या हातीच केंद्रित झाले. जनसामान्यांसाठी या स्वातंत्र्याचा आज ५१ वर्षांनंतरही कोणताही फायदा झालेला नाही. म्हणूनच १६ ऑगस्ट १९४७ रोजी अण्णाभाऊ साठे यांनी जो मोर्चा काढला होता, "ये आजादी झुटी है। देश की जनता भुखी है।" असाच काहीसा सवाल कवयित्री आपल्या कवितेत उपस्थित करतात, हे स्वातंत्र्य कुणासाठी ? हे स्वातंत्र्य आहे काय ? या स्वातंत्र्याचा खरा उपयोग झाला आहे का ? स्वातंत्र्य म्हणजे नुसतं राममंदिर आणि बाबरी मस्जिदच्या दंगलीचे स्वातंत्र्य की, १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला लाल किल्ल्यावर ध्वज फडकवण्याचे स्वातंत्र्य ? इतक्यापुरतेच स्वातंत्र्य हे मर्यादित झाले आहे का ?

तुम्ही कोण? तुमचा वंशज कोणता?
तर
फुले-आंबेडकरी विचारवृक्षाचे
वारसदार आम्ही,
सावित्री - रमाईचे वंशज आम्ही,
आणि
माणसांच्या गर्दीत हरवलेली,
माणुसकी शोधणारेही आम्हीच !

'प्रश्न-उत्तर' या कवितेत मनुसंस्कृतीने समाजापुढे निर्माण केलेल्या प्रश्नांची चर्चा कवयित्रीने उपस्थित केली आहे. तुम्ही कोण ? तुमचा वंश कोणता ? असा प्रश्न विचारल्यानंतर आम्ही फुले-आंबेडकरी विचारांचे वारसदार आहोत, आम्ही सावित्री-रमाईचे वंशज आहोत आणि आम्ही माणसांच्या गर्दीमध्ये हरवलेल्या माणुसकीचा शोध घेणारेही आहोत आणि हीच आमची संस्कृती आहे, हीच आमची परंपरा आहे, हीच आमची माणुसकी आहे.

"माझ्या देशावर
माझे प्रेम आहे. "
म्हणून
देश विकणाऱ्यांसाठी
फक्त आता,
शिल्लक आहे
एकच प्रतिज्ञा
"भारत माझा
देश आहे आणि
त्याला विकून खाणे
माझे कर्तव्य आहे."

शाळेत असताना आपण सर्वांनी "भारत माझा देश आहे.... माझ्या देशावर माझे प्रेम आहे...." ही प्रतिज्ञा म्हटली आहे. परंतु देशाशी बेईमान झालेल्या राजकारणी, गुंड, देश विघातक कृती करणाऱ्या लोकांसाठीही ही प्रतिज्ञा बदललेली असून, भारत माझा देश आहे आणि सर्व भारत विकून खाणे एवढेच माझे कर्तव्य आहे, अशी झाली आहे. आजच्या २१ व्या शतकातील परिस्थिती बघितल्या नंतर कवयित्री काळाच्या किती पुढचा विचार करते हे या कवितेतून आपल्याला लक्षात येते.

लहानपणापासून ऐकते आहे,
माझी ओळख,
"ही तर त्या महाराची पोट्टी"
अरे, महाराची म्हणून काय हाडामासाची
नाही ?
महाराची म्हणून काय, रक्ताची नाही ?
महाराची म्हणून काय
मन, हृदय, भावनांची नाही?
अरे, महाराची
म्हणून काय माणूस नाही ?

माणसाचं कार्यकर्तृत्व न बघता भारतीय समाजामध्ये त्या व्यक्तीची ओळख ही फक्त त्याच्या जातीवरून केली जाते. म्हणूनच कवयित्री देखील लहानपणापासून ऐकत आल्या आहेत की, तिची जी ओळख होती ती महाराची मुलगी म्हणून; परंतु महाराची असली म्हणून काय झाले? मी काय हाडामांसाची नाही, रक्ताची नाही, मला मन, हृदय, भावनाही नाही आणि महार या जातीत जन्म घेतला म्हणून मी काय माणूस नाही? माझं माणूस पण नाकारणार आहेत का ? असा प्रश्न

कवयित्री उपस्थित करते. ज्या लोकांनी महाराची पोर म्हणून मला ओळख दिली त्या लोकांची ओळख करून द्यायची अजूनही बाकी आहे असं कवयित्री म्हणते.

या कवितासंग्रहात जशा सामाजिक विषयावरच्या कविता आहेत, तसेच काही प्रेम कविताही बघायला मिळतात. प्रेम ही भावना अत्यंत हळवी असते. त्यामुळे ज्या व्यक्ती प्रेमामध्ये असतात त्या एकमेकांच्या सुखाने सुखी होतात, तर दुःखाने दुखी होतात. त्यामुळे कुणावर इतकं प्रेम का करावे ?

का करावं कुणावर
प्रेम इतकं की,
सुखानं त्यांच्या सुख
अन् दुःखानं दुःख व्हावं

प्रेम म्हटलं की विरह हा आलाच. विरहाने व्याकुळ झालेल्या प्रेयसीला रात्रीच्या वेळी आपल्या प्रियकराच्या आठवणी, त्याच्या सहवासातील क्षणांची स्वप्ने येतात. दूर असलेल्या प्रियकरावाचून सगळा बिछाना हा अस्वस्थच असतो आणि जणू चुरगळलेल्या चादरीही त्या प्रियकरालाच साद देत असतात.

तुझ्याशिवाय बिछाना सगळा
अस्वस्थच असतो,
चुरगळल्या चादरीही
तुझीच साद देतात...
'प्रेम' अधिष्ठान असतं
माणुसकीचं,
'प्रेम' क्रांती असते
भावविश्वाची

'प्रेम' या कवितेत प्रेम म्हणजे काय? हे सांगताना कवयित्री सांगते की, प्रेम हा अर्थ असतो हृदयाच्या भावनेचा, प्रेम युद्ध असतं, प्रेम काळीज असतं, प्रेम प्रतिभा असते, प्रेम माणुसकीचा अधिष्ठान असतं आणि प्रेम ही भावविश्वाची क्रांती असते.

साऱ्यांची मर्जी सांभाळत भीत-भीत,
येथे जगायचे तर
हीच येथील रीत,
कोंडमारा भावनांचा येथे
अन् यांचे आपण धुराडे!

स्त्रीच्या मनाच्या होणारा कोंडमारा 'तुफान' या कवितेत बघायला मिळतो. घरादारातील सगळ्यांची मर्जी सांभाळत भीतीने जगायचं, आपल्या भावनांचा कोंडमारा करायचा आणि आपणच त्याचे धुराडे व्हायचे. वळणावळणावर येणारी दुःख, प्रेम करावं म्हटलं तर असणारी बंधन, म्हणून सर्वप्रथम भावनांशी आणि बंधनांशी संघर्ष करावा लागतो.

भ्रष्टाचार, हत्या, अपहरण
सवय अशाच शब्दांची झाली
जेव्हापासून पाऊल ठेवले या जमिनीवर,
ओळख यांशी झाली.

'सवय' या कवितेत रोजच घडणाऱ्या घटनांची वृत्तपत्रात येणारी बातमी वाचून रोज रोज त्याच घटना, तेच भ्रष्टाचार, त्याच हत्या, तेच अपहरण हे सगळं वाचून या शब्दांची सवय झालेली असते. जेव्हापासून व्यक्ती आपले पहिले पाऊल या जमिनीवर ठेवतो. घोटाळ्याचे स्तोम, जातीयतेचे दंगे या सर्व सवयीतून सध्याच्या घडीला बाहेर पडणे अशक्य असून हीच जणू मानवी जगण्याची खूण झाली आहे.

नावावरून म्हणे धर्म,
जात ओळखतात !
हिंदू, मुसलमान, बौद्ध,
शीख, ईसाई, पारसी ठरवतात!

आपण स्वतःला कितीही पुरोगामी म्हटलं, फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हटला, तरीही आजही नावावरून जात-धर्म ओळखण्याची पद्धत जागोजागी अस्तित्वात आहे. व्यक्तीची जात जाणून घ्यायची असेल तर आधी त्याचं आडनाव, विचारलं जातं. मग त्यावरून तो हिंदू, मुसलमान, बौद्ध, शीख, ईसाई की पारशी ठरवलं जातं. माणसाची ओळखच लयाला गेली असून, माणूसपण शिल्लक राहिले नसून धर्म आणि जाती शिवाय असलेलं नाव हे सुद्धा आता जात्यंध झालं आहे.

"कोणत्या सीमेचं रक्षण ?<br>
ती सीमा ज्याचं<br>
उल्लंघन होतं,<br>
कोणतं भवितव्य ?<br>
ते भवितव्य जे आम्हांला<br>
बेकारीच्या अंधकारात ढकलतं...?

देशाच्या सीमेवर शत्रूकडून हल्ला झाल्यानंतर, देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी मोहल्ल्यात जेव्हा कोणीतरी घोषणा देते, देशाचं भवितव्य वाचवायला, तुमच्यात देश प्रेम नाही का रे? असा प्रश्न उपस्थित केला जातो; तेव्हा एक हमखास उत्तर दिले जाते की, आम्ही कोणत्या सीमेचं संरक्षण करायचं ? त्या सीमा ज्यांचं नेहमीच उल्लंघन होतं आणि कोणते भवितव्य द्यावे जे नेहमीच आम्हाला बेकारीच्या अंधारात ढकलते आणि आमचं भविष्य अंधारमय करून जाते.

तो समाजच जो<br>
'तिच्यावर 'अत्याचार' करतो,<br>
तोही समाजच जो,<br>
तिला 'उपभोग्य वस्तू' बनवतो का?<br>
का हा समाज आपल्या<br>
गरजेनुसार बदलतो?

'एकच प्रश्न' या कवितेत एक स्त्री समाजापुढे एक प्रश्न उपस्थित करते. त्याचे उत्तर ती समाजाकडून मागते. याचे उत्तर तिला समाजाकडून मिळणार नाही याची खात्री असताना देखील ती प्रश्न विचारण्याच धाडस करते. हा समाज नेहमीच स्त्रीवर अत्याचार करत आलेला आहे. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तू म्हणून तिचा नेहमीच वापर करत आलेला आहे . स्त्री प्रतीची वागणूक समाज आपल्या गरजेनुसार नेहमीच बदलत आलेला आहे.

एकूणच 'इंडिया इज माय कंट्री' हा कवयित्री नेहा गोडघाटे यांचा पहिलाच कवितासंग्रह त्यांच्या प्रतिभेची, प्रगल्भतेची जाणीव वाचकांना करून देतो. काळाच्या पुढे पाहण्याची दृष्टी कवयित्रीच्या कवितांमधून बघायला मिळते. ह्या फक्त केवळ कविताच नाही; तर कवयित्रीला आलेल्या अनुभवांचे, तिने बघितलेल्या समाजाचे वास्तववादी, भीषण चित्रण आहे. म्हणूनच 'इंडिया इज माय कंट्री' हा कवितासंग्रह एक श्रेष्ठ दर्जाची कलाकृती ठरते.

**संदर्भ:**

- इंडिया इज माय कंट्री, नेहा गोडघाटे, युसंवाद प्रकाशन, नागपूर प्र.आ. २००२
- इंडिया इज माय कंट्री, नेहा गोडघाटे, द्वि. आ छवि पब्लिकेशन, नागपूर २०२३